अव्वल मुकदम्यात हुकूमनामा
ऑ. २० कानु. ६, ७, फॉर्म नं. १
**पुरवणी ह, परिशिष्ट १**

दिवाणी अ ३७ म

# हुकूमनामा

## देवगड येथील मे. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) यांचे न्यायालयात

**रे.दि.मु.नं. १५/२०१६**
**नि.ता.१६/०४/२०२६**
**निशाणी क्रमांक -१६९**

वसंत बाबाजी मासये
वय सु. ५० वर्षे, व्यवसाय- शेती,
रा.- मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

} **वादी**

**विरुध्द**

१) दिलीप रामचंद्र मासये,
वय सु. ४५ वर्षे, व्यवसाय- नोकरी,
रा. संघर्ष चाळ, सेवा मंडळ,
पाईप लाईनच्यावरती,
गायत्री शाळेच्या मागे गावदेवी रोड,
तुळशेतपाडा, भांडुप पश्चिम मु. नं. ७८

२) निर्मला रामचंद्र मासये
उर्फ विशाखा विलास कुळकर
वय सु. ३५ वर्षे, व्यवसाय- गृहिणी व शेती
रा. दाभोळे, घाडीवाडी,
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

३) वनिता रामचंद्र मासये
उर्फ कल्पना रामचंद्र घाडी
वय सु. ३८ वर्षे, व्यवसाय-शेती व गृहिणी
रा. तिर्लोट (घाडीवाडी)
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

} **प्रतिवादी**

४)विष्णू गणपत मासये मयत वारस अ ते क

अ) सुनिल विष्णू मासये
वय सु. ४० वर्षे, धंदा- नोकरी,
रा - शिवकृपा अपार्टमेन्ट, रुम नं.०६
बेडेकर नगर, दिवा (पूर्व)

ब) दयानंद विष्णू मासये
वय सु. ३६ वर्षे, धंदा- नोकरी,
रा - लक्ष्मण चाळ रुम. नं.४,
रामनगर, टेंबीपाडा, तानाजीवाडी,
भांडूप (पश्चिम)

क) सरिता विष्णू मासये
उर्फ सुप्रिया संतोष घाडी
वय सु. ३६ वर्षे, धंदा- गृहिणी,
रा - मु.पो.एडगांव, घाडीवाडी,
ता.वैभववाडी, जि. सिंधुदुर्ग

५) सदाशिव लक्ष्मण मासये
वय सु. ६० वर्षे, व्यवसाय- शेती,
रा.- मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

६) मधुकर लक्ष्मण मासये
वय सु. ५८ वर्षे, व्यवसाय- नोकरी,
रा.- मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

७) जगन्नाथ लक्ष्मण मासये
वय सु. ५६ वर्षे, व्यवसाय- नोकरी,
रा.- मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

**प्रतिवादी**

८) प्रकाश लक्ष्मण मासये
वय सु. ५४ वर्षे, व्यवसाय- नोकरी,
रा.- मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

९) संजय लक्ष्मण मासये
वय सु. ५० वर्षे, व्यवसाय- शेती,
रा.- मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

१०) लाडूबाई लक्ष्मण मासये
उर्फ पल्लवी नारायण अनभवणे
वय सु. ५२ वर्षे, व्यवसाय- शेती,
रा.- मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

११) मनोहर महादेव मासये
वय सु. ५७ वर्षे, व्यवसाय- नोकरी,
रा.- ओसवाल टॉवर, बि.नं.४,
'बी' विंग रूम नं १०६,
पहिला माळा, बी. पी रोड, खारेगाव,
भाईंदर पूर्व, जि. ठाणे, पिन कोड ४०११०५

१२) नारायण महादेव मासये
वय सु. ५४ वर्षे, व्यवसाय- शेती,
रा.- मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

१३) शशिकला महादेव मासये
उर्फ सौ. स्मिता अनंत अनभवणे
वय सु. ५६ वर्षे, व्यवसाय- गृहिणी,
रा.- मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

**प्रतिवादी**

१४) दत्ताराम भिकाजी मासये
वय सु. ५२ वर्षे, व्यवसाय- निवृत्त,
रा.- बी १०४, संस्कृती को. ऑप. हौ सोसा.
खरोडी नाका, बोळींज, विरार पश्चिम
ता. वसई, जि. ठाणे.

१५) सतिश भिकाजी मासये
वय सु. ४५ वर्षे, व्यवसाय- निवृत्त,
रा.- ओसवाल टॉवर, बि. नं. ४, '
बी' विंग रूम नं. १०६,
पहिला माळा, बी. पी. रोड, खारेगाव,
भाईंदर पूर्व, जि. ठाणे पिन कोड ४०११०५

१६) नितीन भिकाजी मासये
वय सु. ४२ वर्षे, व्यवसाय- नोकरी,
रा.- ओसवाल टॉवर, बि. नं. ४,
' बी' विंग रूम नं. १०६,
पहिला माळा, बी. पी. रोड, खारेगाव,
भाईंदर पूर्व, जि. ठाणे पिन कोड ४०११०५

१७) संगिता भिकाजी मासये
उर्फ सौ स्वाती रामचंद्र गुरव
वय सु. ४७ वर्षे, व्यवसाय- गृहिणी,
रा.- ओसवाल टॉवर, बि. नं. ४,
'बी' विंग रूम नं. १०६,
पहिला माळा, बी. पी. रोड, खारेगाव,
भाईंदर पूर्व, जि. ठाणे पिन कोड ४०११०५

१८) प्रभावती भिकाजी मासये
वय सु. ७५ वर्षे, व्यवसाय- गृहिणी,
रा.- मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

१९) कृष्णा गोविंद मासये मयत वारस क्र. अ ते ड
अ) श्रीमती वासंती कृष्णा मासये

**प्रतिवादी**

वय सु. सु. ७०, व्यवसाय– गृहिणी
रा. मोंड (तळीवाडी)
ता. देवगड, जि. सिंधुदूर्ग.

ब) श्री. अशोक कृष्णा मासये
वय सु. सु. ६०, व्यवसाय –नोकरी,
रा. संघर्ष चाळ रूम नं. ४३,
पाईप लाईन दत्तमंदिर, तुलसीपाडा,
गावदेवी रोड, भांडूप ४०००७८.

क) श्री. रविंद्र कृष्णा मासये
वय सु. सु. ५२, व्यवसाय –शेती,
रा. मोंड (खालचीवाडी),
ता. देवगड, जि. सिंधुदूर्ग.

ड) सुनिता एकनाथ धुमाळ
वय सु. सु. ५५, व्यवसाय– गृहिणी,
रा. गायत्री विद्यामंदिर २६,
सदोस्वर सेवा मंडळ चाळ, चाळ,
पाईप लाईन रूम नं. ५९,
तुळशेतपाडा, भांडूप (प.) नं. ४०००७८.

२०) शोभा तुकाराम मासये
वय सु. ६५ वर्षे, व्यवसाय– गृहिणी,
रा.– मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

२१) सदानंद तुकाराम मासये
वय सु. ४० वर्षे, व्यवसाय– शेती,
रा.– मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

२२) संदीप तुकाराम मासये
वय सु. ३८ वर्षे, व्यवसाय– शेती,
रा.– मोंड (तळीवाडी),

**प्रतिवादी**

ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

२३) लवू तुकाराम मासये
वय सु. ३५ वर्षे, व्यवसाय- नोकरी,
रा.- मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

२४)अंकुश तुकाराम मासये
वय सु. ३५ वर्षे, व्यवसाय- नोकरी,
रा.- मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

२५) समीर तुकाराम मासये
वय सु. ३० वर्षे, व्यवसाय- शेती,
रा.- मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

**प्रतिवादी**

२६) जयश्री सिताराम मासये
वय सु. ६५ वर्षे, व्यवसाय- गृहिणी,
रा.- मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

२७) सखाराम अनंत मासये
वय सु. ६२ वर्षे, व्यवसाय- शेती,
रा.- मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

२८) नामदेव यशवंत मासये मयत वारस क्र. अ ते ड
अ) प्रेमलता नामदेव मासये
वय सु. सु. ७५, व्यवसाय घरकाम,
रा. ९ माळा, रूम नं. ९०७,
बिल्डींग नं. २, महाकाली दर्शन,
एस.आर.ए. गुंदवली गावठाण,
आझाद रोड, अंधेरी पूर्व, मुं. नं. ४०००६९.

CIVIL JU... दिवाणी ...

ब) श्री. श्रीकांत नामदेव मासये
वय सु. सु. ४०, व्यवसाय नोकरी,
रा. ९ माळा, रूम नं. ९०७,
बिल्डींग नं. २, महाकाली दर्शन,
एस.आर.ए. गुंदवली गावठाण,
आझाद रोड, अंधेरी पूर्व, मुं. नं. ४०००६९.

क) श्री. संतोष नामदेव मासये
वय सु. सु. ३८, व्यवसाय नोकरी,
रा. ९ माळा, रूम नं. ९०७,
बिल्डींग नं. २. महाकाली दर्शन,
एस.आर.ए. गुंदवली गावठाण,
आझाद रोड, अंधेरी पूर्व, मुं. नं. ४०००६९.

ड) सरिता हरिश शिंदे
वय सु. सु. ४५, व्यवसाय घरकाम,
रा. ९ माळा, रूम नं. ९०७,
बिल्डींग नं. २, महाकाली दर्शन,
एस.आर.ए. गुंदवली गावठाण,
आझाद रोड, अंधेरी पूर्व, मुं. नं. ४०००६९.

२९) राजेंद्र यशवंत मासयेमयत वारस क्र. अ ते ब.
अ) सुचिता उर्फ भारती राजेंद्र मासये
वय सु. सु. ५५, व्यवसाय घरकाम,
रा. मोंड (तळीवाडी)
ता. देवगड, जि. सिंधुदूर्ग.

ब) आकांक्षा भारती राजेंद्र मासये
वय सु. सु. २५, व्यवसाय घरकाम,
रा. मोंड (तळीवाडी)
ता. देवगड, जि. सिंधुदूर्ग.

३०) चंद्रकांत बाबाजी मासये
वय सु. ६२ वर्षे, व्यवसाय- निवृत्त,

**प्रतिवादी**

रा.- मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

३१) दशरथ बाबाजी मास
वय सु. ६० वर्षे, व्यवसाय- शेती,
रा.- मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

३२) सुर्यकांत बाबाजी मास
वय सु. ४५ वर्षे, व्यवसाय- शेती,
प्रतिवादी क्र.१८ ते ३२
रा.- मोंड (तळीवाडी),
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

३३) मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद सिंधुदूर्ग ओरोस
जनाबाई रावजी मासये
उर्फ द्रौपदी रावजी वारीक यांचे वारस
श्रीधर रावजी वारीक मयत वारस,

**प्रतिवादी**

३४) शारदा श्रीधर वारीक
वय सु. ४५ वर्षे, व्यवसाय- शेती,
रा.- नाडण, वारीकवाडी,
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

३५)प्रकाश श्रीधर वारीक
वय सु. ३० वर्षे, व्यवसाय- शेती,
रा.- नाडण वारीकवाडी,
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

३६) सुनिल श्रीधर वारीक
वय सु. २८ वर्षे, व्यवसाय- शेती,
रा.- नाडण वारीकवाडी,
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

३७)संदिप श्रीधर वारीक
वय सु. २६ वर्षे, व्यवसाय- शेती,
रा.- नाडण वारीकवाडी,
ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग } **प्रतिवादी**

**दावा किंमत रु.१,०००/-**

**वादी मे.कोर्टास नम्रतापूर्वक कळवितो की,**

गाव मौजे मोंड, मळेगाव व चिंचवाड ता. देवगड, येथील खालील सर्व्हे वर्णनाच्या मिळकती प्रस्तुत दाव्याचा विषय आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

**परिशिष्ट 'अ'**

गाव मौजे मोंड, ता. देवगड, येथील मिळकतींचा तपशिल खालील प्रमाणे-

| अ.नं. | सर्वे नं. | हिस्सा.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | (२)२ | १ | ०.३९.०<br>०.१३.० | ०.३३ | मोंडथरा घरपर्डे |
| २ | (३)३ | २/३बी | ०.०१.०<br>- | ०.०२ | मोंडथरा घराखाली |
| ३ | (३)३ | २/९बी | ०.०४.३<br>०.००.२ | ०.४७ | मोंडथरा घराखाली |
| ४ | (८०)४३ | ३ | ०.०५.०<br>०.४९.० | ०.०६ | धुधर्मीचे काटे |
| ५ | (४११)४५ | १/७ | ०.०१.८<br>- | ०.१६ | धुधर्मीचे |
| ६ | (४१२)४६ | १/६ | ०.०२.०<br>- | ०.०३ | धुधर्मीचे काटेपैकी |
| ७ | (४०२)४८ | १/१६ | ०.०६.४<br>०.००.७ | ०.३० | धुधर्मीची खरी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | (४०२)४८ | १/१८ | ०.०१.५<br>– | ०.०८ | धुधर्मीची खरी |
| ९ | (४०२)४८ | १/३३ | ०.०३.०<br>०.०१.० | ०.०६ | धुधर्मीची खरी |
| १० | (३७७)४९ | २ | ०.००.५<br>०.०२.३ | ०.०२ | धुधम्याचे कापानजीक |
| ११ | (८२)५२अ | १ | ०.०९.०<br>०.६८.० | ०.०५ | धुधमीचे काटेनजीक |
| १२ | (७८)५३ | २१ | २.०६.०<br>१.९९.० | १.२२ | फणस कोंडीची धार |
| १३ | (८२)५२अ | १६ | ०.३१.०<br>०.७२.० | ०.१३ | डिंगीचे कोंड |

## परिशिष्ट 'ब'

गाव मौजे मळेगाव, ता. देवगड, येथील मिळकतींचा तपशील खालील प्रमाणे -

| अ.नं. | सर्वे नं. | हिस्सा.नं. | क्षेत्र<br>हे.आर.पॉ. | आकार<br>रु.पै. | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | (१०२)२० | १ | ०.१५.०<br>०.२१.० | ०.०६ | डिधीची कोंड |
| २ | (१०३)४५ | ११ | १.६५.०<br>०.३७.० | १.० | डिधीचे कोंडीवरील फणस कोंड |
| ३ | (१३७)५९ | ३ | ०.९२.०<br>२.७६.० | ०.५५ | काजऱ्याचा टेंब |
| ४ | (१३८)६० | १ | १.०८.०<br>३.९९.० | ०.४६ | काजऱ्याचा टेंब |
| ५ | (१४३)६४ | ३ | ०.५२.०<br>१.५५.० | ०.२७ | काजऱ्याचे टेंब |
| ६ | (१४४)६५ | १ | २.८९.०<br>२.२५.० | १.६९ | काजऱ्याचे टेंब |

## परिशिष्ट 'क'

गाव मौजे चिंचवाड, ता. देवगड, येथील मिळकतींचा तपशील खालील प्रमाणे-

| अ.नं. | सर्वे नं. | हिस्सा.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | (४५अ१क१)५१ | ११ब | ०.१२.३<br>०.०१.३ | ०.०८ | खरळाची आड |

वरील सर्व्हे वर्णनाच्या मिळकती, त्यातील झाडझाडोरा व इतर तदंगभूत वस्तूंसह दरोबस्त मिळकती प्रस्तुत दाव्याचा विषय आहे.

२) दावा मिळकती या वादी व प्र. वादी नं. १ ते ३२ यांचे कुटुंबाच्या समाईक मालकी हक्काच्या आणि वहिवाटीच्या मिळकती आहेत. वादी व प्र. वादी नं. १ ते ३२ यांच्या कुटुंबाची वंशावळ दाव्यासोबतच्या परिशिष्टात दिलेली आहे. वादी व प्र. वादी नं. १ ते ३२ यांचे राम बाबला मासये हे पूर्वाधिकारी होते. त्यांना रावजी, विठू, गोविंद आणि बाबू असे ४ मुलगे होते. ते चारही मुलगे मयत आहेत. राम मासये यांचे चार मुलांत रावजी हे मोठे व कुटुंबाचे पुढारी होते. त्यानंतर रावजी यांचे पश्चात त्यांच्या मुलांपैकी गणपत आणि गणपत याचे पश्चात त्याचे मुलांपैकी रामचंद्र हे वादी, प्र. वादी कुटुंबाचे कर्ते झाले. दाव्यासोबतच्या परिशिष्टात नमूद राम बाबला मासये यांचा मुलगा रावजी याला गणपत, लक्ष्मण व महादेव असे तिन मुलगे होते. ते तिघेही मयत असून गणपत यांस रामचंद्र व विष्णू असे दोन मुलगे होते. त्यापैकी रामचंद्र मयत आहेत. रामचंद्र यांस प्र. वादी नं. १ हा मुलगा व प्र. वादी नं. २ व ३ या मुली असे वारस आहेत. गणपत याचा दुसरा मुलगा विष्णू हे या दाव्याचे कामी प्र. वादी नं. ४ आहेत. रावजी यांचा दुसरा मुलगा लक्ष्मण यांस प्र. वादी नं. ५ ते ९ हे मुलगे व प्र. वादी नं. १० ही मुलगी असे वारस आहेत. रावजीचा तिसरा मुलगा महादेव यांस प्र. वादी नं. ११ व १२ हे मुलगे आणि प्र. वादी नं. १३ ही मुलगी असे वारस आहेत.

राम बाबला मासये यांचा दुसरा मुलगा विठू यांस यशवंत व बाबाजी या नावाचे दोन मुलगे होते. ते दोघेही मयत असून यशवंत यांस प्र. वादी नं. २८ व २९ असे मुलगे वारस आहेत. तर बाबाजी यांचे वादी तसेच प्र. वादी नं. ३० ते ३२ असे वारस आहेत. राम बाबला मासये यांचा तिसरा मुलगा गोविंद यास भिकाजी व कृष्णा असे दोन मुलगे होते. त्यापैकी भिकाजी हे मयत आहेत. पैकी भिकाजी यांचे प्र. वादी नं. १४ ते १६ हे मुलगे, प्र. वादी नं. १७ ही मुलगी आणि प्र. वादी नं. १८ ही पत्नी असे वारस आहेत. गोविंद यांचा मुलगा कृष्णा प्रस्तुत दाव्याचे कामी प्र. वादी नं. १९ आहे.

राम बाबला मासये यांचा चौथा मुलगा बाबू यांस अनंत नावाचा मुलगा होता. तो मयत असून अनंत यांस तुकाराम, सखाराम व सिताराम असे तिन मुलगे असून त्यापैकी तुकाराम व सिताराम हे मयत आहेत. अनंत यांचा मुलगा सखाराम प्रस्तुत दाव्याचे कामी प्र. वादी नं. २७ असून तुकाराम यांची पत्नी शोभा प्रस्तुत कामी प्र. वादी नं २० तर तुकारामचे मुलगे प्रस्तुत दाव्याचे कामी प्र. वादी नं. २१ ते २५ येथे आहेत. अनंत यांचा मुलगा सिताराम यांस मुलबाळ नाही. त्याची पत्नी जयश्री प्रस्तुत कामी प्र. वादी नं. २६ आहे.

वरील प्रमाणे वादी व प्र. वादी नं. १ ते ३२ यांची वंशावळ असून प्र. वादी नं ३३ यांचे नावाची नोंद २ गुंठे क्षेत्रासाठी दाव्यातील 'ब' परिशिष्टातील स. नं. (१०३) ४५ हि. नं. ११ या मिळकतीचे सातबारापत्रकी दाखल असल्यामुळे त्यांना प्रस्तुत दाव्याचे कामी पक्षकार केले आहे.

**३)** वर नमूद केल्याप्रमाणे दावा मिळकती या वादी व प्र. वादी नं. १ ते ३२ यांचे कुटुंबाचे समाईक मालकी हक्काच्या व वहिवाटीच्या मिळकती आहेत. दावा मिळकतींमध्ये मुळात वादी व प्र. वादी नं. १ ते ३२ यांचा मिळून ८ आणे हिस्सा होता व आहे. तसेच दावा मिळकतीमधील उर्वरित ८ आणे हिस्सा रामचंद्र सदाशिव मासये व बाबू बाबाजी मासये यांचा होता. दाव्यात नमूद केल्याप्रमाणे राम बाबला मासये यांचे

चार मुलात प्रथमतः रावजी, रावजीचे पश्चात गणपत व गणपत यांचे पश्चात रामचंद्र तेच प्र. वादी नं. १ ते ३ चे वडील हे वादी व प्र. वादी नं. १ ते ३२ यांचे कुटुंबाचे कर्ते व पुढारी असल्यामुळे प्रस्तुत दाव्यात नमूद रामचंद्र सदाशिव मासये व बाबू बाबाजी मासये यांचा मिळून ८ आणे हिस्सा वंशावळीत नमूद रावजी, विठू, गोविंद व बाबू यांचे वारसांनी प्र. वादी नं. १ ते ३ चे वडील तेच कुटुंबाचे कर्ते रामचंद्र यांचे नावे दि. ०४/०१/१९९१ चे नोंदणीकृत खरेदीखताने रक्कम रू. ४०,०००/- एवढया रकमेस खरेदी केला. अशाप्रकारे वादी व प्र. वादी नं. १ ते ३२ यांचा मुळात ८ आणे हिस्सा आणि त्यांनी खरेदी केलेल्या उर्वरित ८ आणे हिश्श्यामुळे वादी व प्र. वादी नं. १ ते ३२ दावा मिळकतींचे पूर्ण मालक झाले आहेत.

**४)** दाव्यात नमूद केल्याप्रमाणे राम बाबला मासये यांचे वारसांपैकी प्रथमतः रावजी त्यानंतर गणपत व त्याचे पश्चात रामचंद्र यांची नावे दावा मिळकतीचे रे. ऑ. रा. सदरी नोंदली गेली व रामचंद्र यांचे पश्चात प्र. वादी नं. १ ते ३ यांची नावे दावा मिळकतीचे रे. ऑ. रा. सदरी नोंदली गेली. पूर्वी दाव्यातील 'अ', 'ब' व 'क' परिशिष्टातील मिळकती या मूळ मोंड गावचे महसूल रेकॉर्ड सदरी नोंदलेल्या होत्या. गाव विभाजनानंतर सदरहू मिळकती 'अ', 'ब' व 'क' परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे त्या त्या गावचे महसूल रेकॉर्ड सदरी नोंदल्या गेल्या.

**५)** दाव्यातील 'अ' परिशिष्टातील मिळकतीपैकी स. नं. (२)२ हि. नं. १ या मिळकतीमध्ये वादी व प्र. वादी नं. १ ते ३२ यांचे कुटुंबाचे वडीलोपार्जित घर असून सदरहू घर ग्रामपंचायत रेकॉर्ड सदरी घर नं. २७९अ, ब, क, ड १/१, ड १/२, इ. फ१ व फ२ याप्रमाणे ग्रामपंचायत रेकॉर्ड सदरी स्वतंत्रपणे नोंदलेले आहे. पैकी ग्रामपंचायत घर नं. २७९ब चा इमला वंशावळीत नमूद लक्ष्मण रावजी मासये यांचे नावे, घर नं. २७९क चा इमला वंशावळीत नमूद महादेव रावजी मासये व त्यांची पत्नी शेवंती मासये यांचे नावे नोंदलेला आहे, घर नं. २७९ड१/१ हा इमला वंशावळीत नमूद राजेंद्र

यशवंत मासये व त्यांची पत्नी सुचिता मासये यांचे नावे नोंदलेला आहे, ग्रामपंचायत घर नं. २७९इ चा इमला वंशावळीत नमूद सिताराम अनंत उर्फ अंतू मासये व त्यांची पत्नी जयश्री यांचे नावे नोंदलेला आहे, ग्रामपंचायत घर नं. २७९फ१ चा इमला वंशावळीत नमूद प्रभावती भिकाजी मासये हिचे नावे, तर ग्रामपंचायत घर नं. २७९फ२ चा इमला वंशावळीत नमूद कृष्णा गोविंद मासये व त्यांची पत्नी वासंती मासये यांचे नावे नोंदलेला आहे. ग्रामपंचायत घर नं. २७९अ चा इमला प्रतिवादी १ चे नावे ग्रामपंचायत सदरी नोंदलेला आहे. ग्रामपंचायत घर नं. २७९ड १/२ हा इमला वादी व त्यांचे पत्नीचे नावे नोंदलेला आहे व त्याप्रमाणे प्रत्येकजण आपआपले हिश्याचे क्षेत्रात स्वतंत्रपणे रहातात. तसेच सदरहू मिळकतीमध्ये वंशावळीत नमूद काही हिस्सेदारांचे गोठे असून ते ग्रामपंचायत रेकॉर्ड सदरी त्या त्या व्यक्तीचे नावे नोंदलेले आहेत. ग्रामपंचायत घर नं. ६९३ चा गोठा वादीचे नावे नोंदलेला आहे. घर नं. ६३२ चा गोठा कृष्णा गोविंद मासये यांचे नावे, घर नं. ६४३ चा गोठा नारायण महादेव मासये यांचे नावे, घर नं. ६४३ चा गोठा लक्ष्मण रावजी मासये यांचे नावे, घर नं. ६९२ अ चा गोठा राजेंद्र यशवंत मासये यांचे नावे नोंदलेला आहे. प्रत्येकजण आपआपल्या नावे नोंदलेल्या गोठ्याचा वापर करतात, तसेच 'अ' परिशिष्टातील मिळकतीपैकी स. नं. (८२) ५२अ हि. नं. १ या मिळकतीमध्ये वंशावळीत नमूद काही हिस्सेदारांचे मांगर असून सदरहू मांगर ग्रामपंचायत रेकॉर्ड सदरी त्या त्या व्यक्तीचे नावे स्वतंत्रपणे नोंदलेले आहेत. ग्रामपंचायत मांगर क्र. ५७७ चा इमला वादीचे नावे नोंदलेला आहे. ग्रामपंचायत मांगर क्र. ६०७अ राजेंद्र यशवंत मासये यांचे नावे, मांगर क्र. ७६२ चा इमला सदाशिव लक्ष्मण मासये यांचे नावे, मांगर क्र.५७८ चा इमला तुकाराम अनंत मासये यांचे नावे, मांगर क्र. ७६५ चा इमला कृष्णा गोविंद मासये यांचे नावे नोंदलेला आहे. प्रत्येकजण आपआपल्या नावे नोंदलेल्या मांगराचा वापर करतात.

दाव्यातील 'अ' परिशिष्टातील मिळकतीपैकी स. नं. (७८) ५३ हि. नं. २१ या मिळकतीमध्ये वादी, प्र. वादी १ ते ३२ यांच्या कुटुंबाची वडिलोपार्जित १० हापूस कलमे असून त्याचे उत्पन्नही वादी, प्र. वादी १ ते ३२ एकत्रात घेतात.

दाव्यातील 'अ' परिशिष्टातील स. नं. (८२) ५२अ हि. नं. १६ या मिळकतीमध्ये वादी व प्र. वादी नं. १ ते ३२ यांचे कुटुंबाची वडिलोपार्जित १० हापूस कलमे असून त्याचे उत्पन्नही वादी, प्र. वादी एकत्रात घेतात. सदरहू मिळकतीमध्ये वंशावळीत नमूद यशवंत तेच प्र. वादी नं. २८ व २९ चे वडिल यांनी स्वतंत्रपणे सुमारे २५ वर्षापूर्वी लागवड केलेली सुमारे २० हापूस कलमे आहेत. त्याचे उत्पन्न प्र. वादी नं. २८ व २९ हे स्वतंत्रपणे घेतात. सदरहू मिळकतीमध्ये वंशावळीत नमूद बाबाजी तेच वादी व प्र. वादी नं. ३० ते ३२ चे वडिल यांनी स्वतंत्रपणे सुमारे २५ वर्षापूर्वी लागवड केलेली सुमारे २० हापूस कलमे आहेत. त्याचे उत्पन्न वादी व प्र. वादी नं. ३० ते ३२ हे स्वतंत्रपणे घेतात. सदरहू मिळकतीमध्ये वंशावळीत नमूद लक्ष्मण तेच प्र. वादी नं. ५ ते १० चे वडिल यांनी स्वतंत्रपणे सुमारे २५ वर्षापूर्वी लागवड केलेली सुमारे १० हापूस कलमे आहेत. त्याचे उत्पन्न प्र. वादी नं. ५ ते १० हे स्वतंत्रपणे घेतात. सदरहू मिळकतीमध्ये वंशावळीत नमूद महादेव तेच प्र. वादी नं. ११ ते १३ चे वडिल यांनी स्वतंत्रपणे सुमारे २५ वर्षापूर्वी लागवड केलेली सुमारे १० हापूस कलमे आहेत. त्याचे उत्पन्न प्र. वादी नं. ११ ते १३ हे स्वतंत्रपणे घेतात. सदरहू मिळकतीमध्ये वंशावळीत नमूद भिकाजी तेच प्र. वादी नं. १४ ते १७ चे वडिल आणि प्र. वादी १८ चे पती आणि प्र. वादी नं. १९ यांनी स्वतंत्रपणे सुमारे २५ वर्षापूर्वी लागवड केलेली सुमारे २० हापूस कलमे आहेत. त्याचे उत्पन्न प्र. वादी नं. १४ ते १९ हे स्वतंत्रपणे घेतात. तसेच सदरहू मिळकतीमध्ये वंशावळीत नमूद तुकाराम, सखाराम व सिताराम यांनी स्वतंत्रपणे सुमारे २५ वर्षापूर्वी लागवड केलेली सुमारे २० हापूस कलमे आहेत. त्याचे उत्पन्न प्र. वादी नं. २० ते २७ हे स्वतंत्रपणे घेतात. 'अ' परिशिष्टातील दावा मिळकतींचे उर्वरित क्षेत्रात भातशेती असून वादी व प्र. वादी १ ते ३२ हे आपले अंदाजे हिश्याचे क्षेत्रात भातशेती करतात.

J. D, Deogad
दीश., देवगड

**६)** दाव्यातील 'ब' परिशिष्टामधील स. नं. ४५ हि. नं. ११ या मिळकतीमध्ये वंशावळीत नमूद विष्णू तेच प्र. वादी ४ यांनी लागवड केलेले १ हापूस कलम आहे. सदरहू मिळकतीमध्ये वंशावळीत नमूद लक्ष्मण तेच प्र. वादी नं. ५ ते १० चे वडील यांनी लागवड केलेली सुमारे ५ हापूस कलमे आहेत. सदरहू मिळकतीमध्ये वंशावळीत नमूद

महादेव तेच प्र. वादी नं. ११ ते १३ चे वडील यांनी लागवड केलेली सुमारे ५ हापूस कलमे आहेत. सदरहू मिळकतीमध्ये वंशावळीत नमूद यशवंत तेच प्र. वादी नं. २८ व २९ चे वडील यांनी लागवड केलेली सुमारे ८ हापूस कलमे आहेत. सदरहू मिळकतीमध्ये वंशावळीत नमूद बाबाजी तेच वादी व प्र. वादी नं. ३० ते ३२ चे वडील यांनी लागवड केलेली सुमारे ८ हापूस कलमे आहेत. सदरहू मिळकतीमध्ये वंशावळीत नमूद भिकाजी तेच प्र. वादी नं. १४ ते १७ चे वडील व प्र. वादी १८ चे पती यांनी लागवड केलेली सुमारे ८ हापूस कलमे आहेत. सदरहू मिळकतीमध्ये वंशावळीत नमूद कृष्णा तेच प्र. वादी नं. १९ यांनी लागवड केलेली सुमारे ८ हापूस कलमे आहेत. तसेच सदरहू मिळकतीमध्ये वंशावळीत नमूद अनंतचे वारस तुकाराम, सखाराम व सिताराम यांनी लागवड केलेली सुमारे ८ हापूस कलमे आहेत. 'ब' परिशिष्टातील मिळकतीच्या उर्वरित क्षेत्रात वादी व प्र. वादी हे आपल्या अंदाजे हिश्याचे क्षेत्रात भातशेती करतात व आपआपल्या लागवडीप्रमाणे कलमांचे उत्पन्न घेतात.

७) दाव्यातील 'क' परिशिष्टातील मिळकत वादी, प्र. वादी नं. १ ते ३२ यांचे कुटुंबाची कुळकायदयानुसार संपादित मिळकत आहे. सदरहू मिळकतीमध्येही वादी, प्र. वादी कुटुंबाने लागवड केलेली हापूस कलमे आहेत. सदरहू कलमाचे उत्पन्न वादी, प्रतिवादी १ ते ३२ एकत्रात घेतात.

८) वर नमुद केल्याप्रमाणे दावा मिळकती या वादी व प्र. वादी नं. १ ते ३२ यांचे कुटुंबाच्या समाईक मालकी हक्काच्या आणि वहिवाटीच्या मिळकती आहेत. सदरहू मिळकतीच्या रे. ऑ. रा. सदरी आपली नावे सहहिस्सेदार म्हणून दाखल होण्यासाठी प्र. वादी नं. ५, ११, १४, १९, २८, ३० आणि प्र. वादी २० चे पती कै. तुकाराम यांनी सन २००७ मध्ये मागणी केली होती. दावा मिळकती या तीन स्वतंत्र महसूल गावात नोंदलेल्या असल्यामुळे त्यासंदर्भात मोंड फेरफार नं. ६४००, मळेगाव फेरफार नं. [illegible]०९ आणि चिंचवाड फेरफार नं. २७६ च्या फेरफार नोंदी घालण्यात आल्या व त्या मंजुरी

झाल्या. मात्र त्यापैकी मोंड फेरफार नं. ६४०० व मळेगाव फेरफार नं. ६०९ च्या नोंदींवरूद्ध प्र. वादी नं. १ ते ३ यांनी अपिले दाखल केली होती. त्यापैकी मळेगाव फेरफार नं. ६०९ विरूद्धचे अपिल फेटाळण्यात आले व मोंड फेरफार नं. ६४०० विरूद्धचे अपिल अप्पर आयुक्त कोकण विभाग मुंबई यांचे न्यायालयापर्यंत चालले. त्याकामी सहहिस्सेदारीची मागणी फेटाळून लावण्यात आली. मात्र तसे करताना

संबंधित न्यायालयाने दिवाणी न्यायालयाचा कोणताही आदेश नसल्याचे कारणाने सदरहू सहहिस्सेदारीची मागणी नामंजूर केली. मात्र दावा मिळकतींमधील वादी व अन्य हिस्सेदारांची दाव्यात नमूद केल्याप्रमाणेची वहिवाट आजतागायत चालू होती व आहे. या सर्व परिस्थितीत वादीने प्र. वादी नं. १ यांचेकडे डिसेंबर २०१५ मध्ये दावा मिळकतींचे आपआपसात समजुतीने वाटप करून घेणेबाबत सुचविले असता त्यास प्र. वादी नं. १ यांनी योग्य तो प्रतिसाद दिलेला नाही. म्हणून दावा मिळकतींचे सरस निरस व रहारास्त वाटप होवून मिळणेसाठी वादीस प्रस्तुत दावा दाखल करणे भाग पडत आहे. दावा मिळकतीमधील वडिलोपार्जित घर इमल्याचे वादी, प्र. वादींमध्ये समजूतीने फार पूर्वीच वाटप झाले असून त्याप्रमाणे ग्रामपंचायत रेकॉर्डसदरी बदलही झालेले आहेत. त्यामुळे वादीस सदरहू वडिलोपार्जित घर इमल्याचे वाटपाची दाद मागावयाची नाही. मात्र प्र. वादीं नं. १ ते ३ यांनी सदरहू इमल्याचे वाटपाबाबत तक्रार केल्यास याचकामी सदरहू वडिलोपार्जित घर इमल्याचेही वाटप होवून मिळावे. त्या परिस्थितीत नियमानुसार होणारी कोर्ट फी देणेस वादी तयार आहे.

**९)** दावा मिळकतीमध्ये वादी व प्र. वादी नं. २८ ते ३२ यांचा मिळून १/४ हिस्सा असून प्र. वादी नं. १ ते १३ यांचा मिळून १/४ हिस्सा आहे. दावा मिळकतींमध्ये प्र. वादी १४ ते १९ यांचा मिळून १/४ हिस्सा असून प्र. वादी नं. २० ते २७ यांचा मिळून १/४ हिस्सा आहे.

**१०)** प्र. वादी नं. ३३ यांचेबरोबर वादी अगर प्र. वादी नं. ३० ते ३२ यांनी

कोणताही व्यवहार केलेला नाही.

**११) <u>दाव्यास कारण-</u>** डिसेंबर २०१५ मध्ये वादीने प्र. वादी १ कडे दावा मिळकतींचे आपआपसात समजुतीने वाटप करून मागितले. त्यावेळी प्रतिवादीने त्यास योग्य तो प्रतिसाद दिला नाही. त्यावेळी प्रथम व त्यानंतर सतत या मे. कोर्टाचे स्थलसिमेत मौजे मोंड, ता. देवगड येथे घडले आहे. सबब हा दावा चालविण्याचा या मे. कोर्टास हक्काधिकार आहे.

प्रस्तुत कारणासाठी वादीने अन्य कोणत्याही न्यायालयात दाद मागितलेली नाही.

**१२) <u>दाव्याची आकारणी</u> -** प्रस्तुत दावा वाटपासाठी असल्याने दाव्याची आकारणी दावा मिळकतींचा एकूण दस्त रू. ७.०४/- पैसे पैकी वादी व प्र. वादी नं. २८ ते ३२ यांचे १/४ हिश्याचा दस्त रू. १.७६/- पैसे त्याची २०० पट रू. ३५२/- एवढी होत असली तरी दाव्याची आकारणी रू. १,०००/- करून त्यावर रक्कम रू. २००/-चा कोर्ट फी स्टॅम्प दिला आहे. वकील फी, प्रोसेस, मे. कोर्टाचा अधिकार यासाठी दाव्याची आकारणी तेवढीच केली आहे.

**१३) सबब वादीची विनंती की,**

१) दावा मिळकतींचे सरस निरस व रहारास्त वाटप करणेत येवून दावा मिळकतींमधील वादी व प्र. वादी नं. २८ ते ३२ यांचा १/४ हिस्सा पृथक कब्जाने वादीस देववावा.

२) दावा मिळकतींचे वाटप करताना वादी व प्र. वादी २८ ते ३२ यांनी सुधारणा केलेले व लागवड केलेले क्षेत्र प्राधान्याने त्यांचे हिश्यास नेमून देण्यात यावे.

३) दावा मिळकतींचे वाटप मे. जिल्हाधिकारी सिंधुदूर्ग ओरोस यांचेमार्फत करण्यात यावे.

४) जरूर पडल्यास दाव्यात दुरूस्ती करण्याची सवड व परवानगी वादीस देववावी.

५) या दाव्याचा खर्च तक्रारी प्र. वादींकडून वादीस देववावा.

६) न्यायाअंती इतर योग्य ती दाद वादीस देववावी.

येणेप्रमाणे दावा आहे.

# वंशावळ

- बाबला
  - राम
    - रावजी
      - गणपत
        - रामचंद्र
          - दिलीप — प्र.वादी१
          - निर्मला — प्र.वादी२
          - वनिता — प्र.वादी३
        - विष्णू — प्र.वादी४
      - लक्ष्मण
        - सदाशिव — प्र.वादी५
        - मधुकर — प्र.वादी६
        - जगन्नाथ — प्र.वादी७
        - प्रकाश — प्र.वादी८
        - संजय — प्र.वादी९
        - लाडूबाई — प्र.वादी१०
      - महादेव
        - मनोहर — प्र.वादी११
        - नारायण — प्र.वादी१२
        - शशिकला — प्र.वादी१३
    - विठू
      - यशवंत
        - [illegible] — प्र.वादी२८
        - [illegible] — प्र.वादी२९
      - बाबाजी
        - [illegible] — प्र.वादी३०
        - ~~दशरथ~~ — प्र.वादी३१
        - ~~वसंत~~ — वादी
        - [illegible] — प्र.वादी३२
    - गोविंद
      - भिकाजी → प्रभावती — प्र.वादी१८
        - संगिता — प्र.वादी१७
        - दत्ताराम — प्र.वादी१४
        - सतिश — प्र.वादी१५
        - नितीन — प्र.वादी१६
      - कृष्णा — प्र.वादी१९
    - बाबू
      - अनंत
        - तुकाराम → शोभा — प्र.वादी२०
          - सदानंद — प्र.वादी२१
          - संदीप — प्र.वादी२२
          - लवू — प्र.वादी२३
          - अंकुश — प्र.वादी२४
          - समीर — प्र.वादी२५
        - सखाराम — प्र.वादी२७
        - सिताराम → जयश्री — प्र.वादी२६

CIVIL JUDGE

आज दिनांक १६ माहे एप्रिल सन २०२६ रोजी, श्री. एस.एस.पचंडी, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), देवगड, जि.सिंधुदुर्ग यांचे समोर वादी हजर तर्फे वकील श्री.डी.आर.गोरे हजर, सबब त्यांचे समक्ष, प्रतिवादी क्र.१ गैरहजर तर्फे वकील श्री.व्ही.आर.नाईक गैरहजर, प्रतिवादी क्र.४अ ते ४क गैरहजर तर्फे वकील श्री.एल.एल.नाथगोसावी हजर, प्रतिवादी क्र.५ ते ९, ११, १२, १४ ते १८, २० ते २७, ३० ते ३२ गैरहजर तर्फे वकील श्री.आय.व्ही.ठाकूर हजर, प्रतिवादी क्र. १९ब, २८ब, २९अ गैरहजर तर्फे वकील श्रीम.आरती दामले हजर, सबब त्यांचे समक्ष, दावा निकाली निघालेवरुन असा हुकुम होत आहे की,

| | **<u>आदेश</u>** |
|---|---|
| १. | दावा मंजूर करण्यात येतो. |
| २. | दावा मिळकतीमध्ये वादी यांचा १/३२ हिस्सा, प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा प्रत्येकी १/९६ हिस्सा, प्रतिवादी क्र.४अ, ४ब, ४क यांचा प्रत्येकी १/९६ हिस्सा, प्रतिवादी क्र.५ ते १० यांचा प्रत्येकी १/९६ हिस्सा, प्रतिवादी क्र.१ ते १३ यांचा प्रत्येकी १/४८ हिस्सा, प्रतिवादी क्र.१४ ते १८ यांचा प्रत्येकी १/४० हिस्सा, प्रतिवादी क्र.१९अ, १९ब, १९क यांचा प्रत्येकी १/२४ हिस्सा, प्रतिवादी क्र.२० ते २५ यांचा प्रत्येकी १/७२ हिस्सा, प्रतिवादी क्र.२६ यांचा प्रत्येकी १/१२ हिस्सा, प्रतिवादी क्र.२७ यांचा प्रत्येकी १/१२ हिस्सा, प्रतिवादी क्र. २८अ, २८ब, २८क, २८ड यांचा प्रत्येकी १/६४ हिस्सा, प्रतिवादी क्र.२९अ, २९ब यांचा प्रत्येकी १/३२ हिस्सा, प्रतिवादी क्र.३० ते ३२ यांचा प्रत्येकी १/३२ हिस्सा, प्रतिवादी क्र.३४ ते ३७ यांचा प्रत्येकी १/६४ |

| | |
|---|---|
| | हिस्सा, असल्याचे जाहिर करण्यात येते. |
| ३. | वादी व प्रतिवादी यांच्या कब्जास असलेले क्षेत्र वाटपामध्ये प्राधान्याने त्यांच्या हिश्यास नेमून देण्यात यावे. |
| ४. | दावा शेत मिळकतीचे वर नमूद केल्याप्रमाणे वाटप महाराष्ट्र तुकडे बंदी व तुकडे जोड कायदयातील तरतूदीस अधीन राहून करण्याकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ५४ अन्वये हुकूमनामा जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांच्याकडे पाठविण्यात यावा. |
| ५. | वादी व प्रतिवादी यांनी आपआपला खर्च सोसावा. |
| ६. | येणे प्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा. |

CIVIL JUDGE
दिवाणी न्याया

**मे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, देवगड यांचे न्यायालयात**

नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक १५/**२०१६ निकाल तारीख-१६/०४/२०२६**

**निशाणी क्रमांक १६९ लगत**

**खर्चाचा आकडा**

| अ.क्र. | वादी यांना झालेला खर्च | रुपये | पैसे | अ.क्र | प्रतिवादी क्र.५ ते ९,११,१२,१४ ते १८, २० ते २७,३०ते३२ यांना झालेला खर्च | रुपये | पैसे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | फिर्याद अर्जास स्टॅम्प – नि.१ | २०० | ०० | १ | वजावटीला किंवा विरुद्ध दाव्यास स्टॅम्प | ०० | ०० |
| २ | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प –नि.२<br>रु.१०/- प्रमाणे | १० | ०० | २ | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प -नि.३३,३७<br>रु.१०/- प्रमाणे | २० | ०० |
| ३ | दाखल झालेल्या कागदास स्टॅम्प –नि.५ ते २४,१०८ ते १३९,१४१,१६० ते १६२, १६७ प्रत्येकी रु. ५/- प्रमाणे | २८५ | ०० | ३ | दाखल झालेल्या कागदास स्टॅम्प – नि.---<br>प्रत्येकी रु. ५/- प्रमाणे | ०० | ०० |
| ४ | भत्ता- | ०० | ०० | ४ | भत्ता - | ०० | ०० |
| ५ | फिर्यादीतील दाव्यावरील प्लीडराची फी - दावा रक्कम रु.१,०००/- | १५० | ०० | ५ | फिर्यादीतील दाव्यावरील प्लीडराची फी - दावा रक्कम रु.१,०००/- | १५० | ०० |
| ६ | प्रोसेस लागू करणे | ०० | ०० | ६ | प्रोसेस लागू करणे | ०० | ०० |
| ७ | तहकुबीबद्दल दिलेले अर्ज – नि.१४७<br>प्रत्येकी रु. १०/- प्रमाणे | १० | ०० | ७ | तहकुबीबद्दल दिलेले अर्ज –नि.-----<br>प्रत्येकी रु. १०/- प्रमाणे | ०० | ०० |
| ८ | इतर अर्ज - नि.४०,४३,४५ ते४७, ५८, ६१ ते६३,६८ ते ७०,७७,७९,८१, ८६,९६ते१०२,१०४ते१०६,१४३,१५४, १५६,१५८,१६५<br>प्रत्येकी रु. ५ /- प्रमाणे | १५५ | ०० | ८ | इतर अर्ज - नि.३२<br>प्रत्येकी रु. ५ /- प्रमाणे | ०५ | ०० |
| | **एकूण** | **८१०** | **००** | | **एकूण** | **१७५** | **००** |
| | **न दिलेला खर्च** | | | | **न दिलेला खर्च** | | |
| १ | न्यायालयीन शुल्क परतावा | ०० | ०० | १ | न्यायालयीन शुल्क परतावा | ०० | ०० |
| २ | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प नि.----- | ०० | ०० | २ | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प -नि.३७<br>रु.१०/- प्रमाणे | १० | ०० |
| ३ | तहकुबीबद्दल दिलेले अर्ज – नि.१४७<br>प्रत्येकी रु. १०/- प्रमाणे | १० | ०० | ३ | तहकुबीबद्दल दिलेले अर्ज –नि.-----<br>प्रत्येकी रु. १०/- प्रमाणे | ०० | ०० |
| ४ | इतर अर्ज | ०० | ०० | ४ | इतर अर्ज | ०० | ०० |
| | **एकुण** | **१०** | **००** | | **एकुण** | **१०** | **००** |
| | **बाकी** | **८००** | **००** | | **बाकी** | **१६५** | **००** |
| | **पूर्णांकात** | **८००** | **००** | | **पूर्णांकात** | **१६५** | **००** |

## मे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, देवगड यांचे न्यायालयात

नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक १५/२०१६ **निकाल तारीख-१६/०४/२०२६**

**निशाणी क्रमांक १६९ लगत**

**खर्चाचा आकडा**

| अ.क्र. | प्रतिवादी क्र.१ यांना झालेला खर्च | रुपये | पैसे | अ.क्र | प्रतिवादी क्र.४अ ते ४क ला झालेला खर्च | रुपये | पैसे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वजावटीला किंवा विरुद्ध दाव्यास स्टॅम्प | ०० | ०० | १ | वजावटीला किंवा विरुद्ध दाव्यास स्टॅम्प | ०० | ०० |
| २ | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प -नि.५३ प्रत्येकी रु.१० प्रमाणे | १० | ०० | २ | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प -नि.७४ प्रत्येकी रु.१० प्रमाणे | १० | ०० |
| ३ | दाखल झालेल्या कागदास स्टॅम्प - | ०० | ०० | ३ | दाखल झालेल्या कागदास स्टॅम्प - | ०० | ०० |
| ४ | भत्ता | ०० | ०० | ४ | भत्ता | ०० | ०० |
| ५ | फिर्यादीतील दाव्यावरील प्लीडराची फी - दावा रक्कम रु.१,०००/- | १५० | ०० | ५ | फिर्यादीतील दाव्यावरील प्लीडराची फी दावा रक्कम रु.१,०००/- | १५० | ०० |
| ६ | प्रोसेस लागू करणे | ०० | ०० | ६ | प्रोसेस लागू करणे | ०० | ०० |
| ७ | तहकुबीबद्दल दिलेले अर्ज – नि.१४४,१४६, १४९ प्रत्येकी रु. १०/- प्रमाणे | ३० | ०० | ७ | तहकुबीबद्दल दिलेले अर्ज –नि.----- प्रत्येकी रु. १०/- प्रमाणे | ०० | ०० |
| ८ | इतर अर्ज-- नि.५२,५५,५६,१५० प्रत्येकी रु. ५/- प्रमाणे | २० | ०० | ८ | इतर अर्ज नि.------ रु. ५/- प्रमाणे | ०० | ०० |
| | **एकूण** | **२१०** | **००** | | **एकूण** | **१६०** | **००** |
| | **न दिलेला खर्च** | | | | **न दिलेला खर्च** | | |
| | न्यायालयीन शुल्क परतावा | ०० | ०० | | न्यायालयीन शुल्क परतावा | ०० | ०० |
| | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प -नि.----- प्रत्येकी रु. १०/- प्रमाणे | ०० | ०० | | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प -नि.----- प्रत्येकी रु. १०/- प्रमाणे | ०० | ०० |
| | तहकुबीबद्दल दिलेले अर्ज – नि.१४४,१४६, १४९ प्रत्येकी रु. १०/- प्रमाणे | ३० | ०० | | तहकुबीबद्दल दिलेले अर्ज –नि.----- प्रत्येकी रु. १०/- प्रमाणे | ०० | ०० |
| | इतर अर्ज | ०० | ०० | | इतर अर्ज | ०० | ०० |
| | **एकुण** | **३०** | **००** | | **एकुण** | **००** | **००** |
| | **बाकी** | **१८०** | **००** | | **बाकी** | **१६०** | **००** |
| | **पूर्णांकात** | **१८०** | **००** | | **पूर्णांकात** | **१६०** | **००** |

**मे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, देवगड यांचे न्यायालयात**

नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक **१५/२०१६ निकाल तारीख-१६/०४/२०२६**

**निशाणी क्रमांक १६९ लगत**

**खर्चाचा आकडा**

| अ.क्र. | प्रतिवादी क्र.१९ब,२८ब ते २९ अ यांना झालेला खर्च | रुपये | पैसे |
|---|---|---|---|
| १ | वजावटीला किंवा विरुद्ध दाव्यास स्टॅम्प | ०० | ०० |
| २ | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प -नि.९३<br>प्रत्येकी रु.१० प्रमाणे | १० | ०० |
| ३ | दाखल झालेल्या कागदास स्टॅम्प – नि.----- | ०० | ०० |
| ४ | भत्ता | ०० | ०० |
| ५ | फिर्यादीतील दाव्यावरील प्लीडराची फी -<br>दावा रक्कम रु.१,०००/- | १५० | ०० |
| ६ | प्रोसेस लागू करणे | ०० | ०० |
| ७ | तहकुबीबद्दल दिलेले अर्ज – नि.----<br>प्रत्येकी रु. १०/- प्रमाणे | ०० | ०० |
| ८ | इतर अर्ज-- नि.----<br>प्रत्येकी रु. ५/- प्रमाणे | ०० | ०० |
| | **एकूण** | **१६०** | **००** |
| | **न दिलेला खर्च** | | |
| १ | न्यायालयीन शुल्क परतावा | ०० | ०० |
| २ | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प -नि.-----<br>प्रत्येकी रु. १०/- प्रमाणे | ०० | ०० |
| ३ | तहकुबीबद्दल दिलेले अर्ज – नि.----<br>प्रत्येकी रु. १०/- प्रमाणे | ०० | ०० |
| ४ | इतर अर्ज-- नि.----<br>प्रत्येकी रु. ५/- प्रमाणे | ०० | ०० |
| | **एकुण** | **००** | **००** |
| | **बाकी** | **१६०** | **००** |
| | **पूर्णांकात** | **१६०** | **००** |

**आज तारीख १६ माहे एप्रिल सन २०२६ रोजी आमच्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**

CIVIL JUDGE J. D, Deogad
सत्यमेव जयते
दिवाणी न्यायाधीश, देवगड

| तयार करणार | तपासले बरोबर आहे |
|---|---|
| (सही) | (सही) |
| (ए.एस.कुळकर्णी) | (आर.ई.मणचेकर) |
| क.लिपीक | व.लिपीक |

CIVIL JUDGE J. D, Deogad
सत्यमेव जयते
दिवाणी न्यायाधीश, देवगड

(सही) १६/४/२६

**(श्रीकांत.एस.पचंडी)**
**दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),**
**देवगड**

| | | |
|---|---|---|
| वादीतर्फे वकील | - श्री.डी.आर.गोरे | |
| प्रतिवादी क्र.१ तर्फे वकील | - श्री.व्ही.आर.नाईक | - सही करणेस गैरहजर |
| प्रतिवादी क्र.४अ ते ४क तर्फे वकील | - श्री.एल.एल.नाथगोसावी | - सही करणेस गैरहजर |
| प्रतिवादी क्र.५ते९,११,१२,१४ते१८,२०ते २७, ३० ते ३२ तर्फे वकील | - श्री.आय.व्ही.ठाकूर | - सही करणेस गैरहजर |
| प्रतिवादी क्र.१९ब,२८ब,२९अ तर्फे वकील | -श्रीम.आरती दामले | - सही करणेस गैरहजर. |
| प्रतिवादी क्र.२,३,१०,१३,१९अ,१९क,१९ड,२८अ,२८क, २८ड,२९ब,३३ते ३७ | -एकतर्फा | |

(ह्या मुकदम्यातील पक्षकाराना अशी ताकीद देणेत येते की, त्यांनी हजर केलेले कोणतेही दस्तऐवज जर ते परत नेले नाहीत तर अपील झाले असल्यास अपिलाचा निकाल झाल्यावर रेकॉर्ड नाश करणेच्या प्रचलित नियमास अनुसरुन नाश करुन टाकण्यास पात्र होतील.)